फौ. कि. अर्ज .क्र.३५/२०२५
निकिता वि. जय
नि.क्र. ९ खाली

**गैरअर्जदारतर्फे विद्वान विधिज्ञ श्री. एम. बी. गुडदे यांचेमार्फत उलटतपास शपथेवर सुरु**

हे म्हणणे खरे नाही की आमचे लग्न साधेपणाने झाले  लग्नाचा खर्चे ज्याचा त्याने केला मी माझ्या सरतपासामध्ये नमुद केल्याप्रमाणे वस्तू लग्नात मला दिल्याबाबत मी कागदोपत्रीपुरावा या प्रकरणात दाखल केला नाही. वस्तु मला लग्नात मिळालयाबदद्ल माझ्याकडे पुरावा आहे. हेम्हणणे खरे नाही की मी मला लग्नात माझ्या वडीलांनी वस्तु दिल्याबाबतचे खोटे नमुद केले आहे हे म्हणणे खोटे आहे. हे म्हणणे खरे नाही की मला हुंडा दिल्याचे खोटे नमुद केले आहे . साक्षीदार स्वतःहुन सांगतात की अंगुटी दिलही होती इतर काही दिले नव्हते हे म्हणणे खरे नाही की वस्तु हया गैअर्जदार यांचेकडे असल्याचे मी खोटे नमुद केले आहे हे म्हणणे खरे नाही. तसेच हे म्हणणे खरे नाही की  लग्नात दहा बारा लाख माझ्या आई वडीलांनी खर्चे केले आहे. मी लग्नाला दहा बारा लाख ख्चर्क आला आहे याबाबत मी कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही साक्षीदार स्वतःहुन सांगतात की त्याबद्दल कागदोपत्री पुरावा दाखल करु शकते.हे म्हणणे खरे आहे की गैअर्जदार आयटी आय कंपनीत इंजीनिअर असल्याबाबत कागदोपत्री पुरावा दाखल केला नाही.

प्रश्न १ – तुम्ही तुमच्या सरतपासात गैअर्जदार शुक्रवारी येतात व सोमवारी जातात असे म्हण्टले आहे ?

उत्तर – गैअर्जदार हे शनिवारी सकाळी येतात व रविवारी सायंकाळी जातात. गैरअर्जदार हे केवळ सदरील दोन दिवस घरी येत होते व त्यांचा नेहमीचेच होते. हे म्हणणे खरे नाही की मी माझ्या सरतपासामध्ये परिच्छेद क्र ३ मध्ये सासु नणंद बाबत केलेले आरोप खोटे आहे हे म्हणणे खरे नाही  की गैअर्जदार यांने आई व बहिण यांना काहीही न सांगता दबावात घेतल्याचे हे म्हणणे खरे नाही  मीमाझ्या सरतपासाचे प्रतिज्ञापत्रमध्ये परिच्छेद क्र

४ मधील मजकुर खोटा केला आहे. गैअर्जदार जेथे कामास होते त्याठिकाणी मला गैअर्जदार यांनी नेले असते तर मी गेले असते तशी माझी इच्छा होती. हे म्हणणे खरे नाही मला  त्यांनी पुणे येथे घेवुन जावे अशी मी त्यांना मागणी करत होते .हे म्हणणे खरे आहे की गैअर्जदार यांच्या आईला अर्धांगवायु झालेला आहे व त्यांची शरीराची एक बाजु कमकुवत आहे.हे म्हणणे खरे  आहे की गैअज्रदार यांची एक अविवाही बहिण देखील आहे व एक अविवाहीत भाउ देखील आहे  मी माझ्या सरतपासाचे प्रतिज्ञापत्रमध्ये परिच्छेद क्र ५ मधील मजकुर संपर्ण खोटा आहे. हे म्हणणे खरे आहे की गैअर्जदार यांचा मी नेहमी फोन पाहत होते हे म्हणणे खरे नाही एकेवेळी जेव्हा गैअज्रदार यांनी माझा फोन पाहण्यासाठी घेश्तला तेव्हा मी माझा फोन त्यांच्या हातामध्ुन घेवुन खाली गेले व गैअर्जदार माझ्या पाठीमागे खाली आल्यानंतर मी पुन्हा परत वर निघुन गेले

महिला तक्रार निवारण केद्र संभाजीनगर येथे तक्रार केल्याबाबत मी कागदोपत्री पुरावा मी न्यायालयात दाखल केला नाही.

प्रश्न – तुम्ही महिला तक्रार निवारण केद्रात गेल्यानंतर  तुमही गैअर्जदार सोबत नांदायला जाण्यासाठी पोलिस अधिकारी यांनी सांगितले होते परंतु तुम्ही गेल्या नाहीत ?

उत्तर – मला गैअर्जदार नांदायला घेवुन गेले नव्हते

हे म्हणणे खरे नाही की, मला गैअर्जदार नांदायला घेवुन गेले नसल्याचे मी खोटे सांगत आहे .हे म्हणणे खरे आहे सदर महिला तक्रार निवारण केंद्रात प्रकरण बंद करण्यासठी सांगितल्यानंतर ते प्रकरण बंद करण्यात आले होते. माझ्या आईवडिलांची परिसिथती पुर्वी पासुन हलाकीची नव्हती माझ्या लग्नापासुन हलाकीची होती . हे म्हणणे खरे आहे की मी गैअर्जदार क्र १ यांच्या मालकीचे घर असल्याबाबत कोण्ताही पुरावा दाखल केला नाही तसेच तसा कोणताही कागदोपत्री पुरावा माझ्याजवळ नाही हे म्हणणे खरे नाही की मी माझ्या सरतपासाच्या प्रतिज्ञापत्रात गैअर्जदार क्र. १ यांचे मालकीचे घर

असलयाचे मी खोटे नमुद केले आहे

गैरअर्जदार क्र. १ हे पुणे येथे आयटी कंपनीत कामास असल्याबाबत व त्यांना ७० हजार रुपण पगार असल्याबाबत कोणताही कागद दाखल केला नाही. हे म्हणणे खरे नाही की मी माझ्या सरतपासाच्या प्रतिज्ञापत्रात गैअर्जदार क्र१ यांना ७० हजार रुपण व ते आयटी कंपनी असल्याबाबत मी खोटे नमुद केले आहे. हे म्हणणे खरे आहे की मी याप्रकरणा व्यतिरिक्त् गंगापुर न्यायालयात महिलांचे कौटुबिक हिंसाचारापासुन संरक्षण कायदयान्वये पोटगी मिळण्याकामी एक प्रकरण दाखल केले असुन ते प्रकरण प्रलंबित आहे. हे म्हणणे खरे आहे की मी गंगापुर न्यायालयात खाजगी फौजदारी प्रकरण ज्याचा क्र आर सि सि १९१/२०२५ निकीता वि जय भा द वि कलम ४९८ अंतर्गत दाखल केलेले आहे तसेच पोलिस स्टेशन वाळुज एम आय डिसी येथे फिर्याद दिली होती व त्यात दोषारोप पत्र् न्यायालयात सादर झाले असुन त्याचा क्र आर सि सि १७३/२०२६ असा आहे हे म्हणणे खरे आहे की मा. दि. न्यायालय वरिष्ठ स्तर येथे एच एमपी नं २७२/२०२५ निकीता वि जय हे प्रकरण दाखल केले आहे हे म्हणणे खरे नाही की वरील सर्व प्रकरणे गैअर्जदार क्र १ यांना त्रास देण्यासाठी दाखल केलेले आहे हया वरीलप्रकरणात मी वेगवेगळया तारखा घेते. हे म्हणणे खरे नाही सदरील सर्व प्रकरण हि मी गैअर्जदार हे तडजोडीला येतील व पैसे देतील यासाठी दाखल केलेले आहे हे म्हणणे खरे आहे की सदरील प्रकरणे हि मला गैअर्जदार यांनी नुकसान भरपाई म्हणुन ६ लाख रुपए माझ्या वडीलांच्या म्हणण्याप्रमाणे दयावे म्हणुन दाखल केलेले आहेत हे म्हण्णणे खरे नाही की वरील सर्व प्रकरणे दाखल करणे पुर्वी गैअर्जदार क्र १ यांना रक्म रुपए ६ लाखची मागणी केली होती . हे म्हणणे खरे नाही माझे वडील आम्हला मुलगी नांदावायला पाठवायची नाही तिला घटस्फोट दया असे माझे वडील म्हणााले होते माझी झेपण्ययाची वेळ फिक्स नव्हती तरी मी साधारणतः ११ वाजता झोपत होते. हे म्हणणे खरे

नाही मी माझ्या सरतपासाच्या प्रतिज्ञापत्रात गैअर्जदार क्र१ हे माझे सोबत एकही वेळा झोपले नसल्याचे व एकही वेळा शारीरीक संबंध ठेवल्याचे मी खोटे नमुद केले आहे हे म्हणणे खरे नाही की गैअज्रदार क्र १ हे माझ्या सोबत झोपत होते व शारीरी क संबंध ठेवत होते हे म्हणणे खरेनाही की मी माझ्या माहेरी माझ्या इच्छेप्रमाणे रहायला गेले हे म्हणणे खरे आहे की मी एक इलेक्ट्रीक बाईक खरेदी केली आहे व मला महाराष्ट्र शासनाचे योजनेप्रमाणे लाडकी बहिण या योजनेत महिण्याकाठी १५०० मिळतात.

हे म्हणणे खरे आहे की, मला नांदायचे नाही. आई वडीलांच्या सांगण्यावरुन मी लग्न केले असे म्हणत होते साक्षीदार स्वतःहुन सांगतात मला गैअर्जदार तसे म्हणत होते.

**उलटतपास हा गैरअर्जदार यांचे वकीलांनी प्रस्तुतचे प्रकरण या न्यायालयासमोर चालवायचे नसल्याबाबतच्या दिलेल्या निशाणी क्र. १५ अर्जान्वये पुढील तारखेपर्यंत तहकुब.**

श्रवणोत्तर स्वीकृत व समक्ष,

SHAIKH MOHSIN ASLAM

Digitally signed by SHAIKH MOHSIN ASLAM
Date: 2026.03.18 12:50:12 +0530

दिनांक :–१३.०३.२०२६

(एम. ए. शेख )
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.२, गंगापुर.